बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०९ ऑगस्ट २०२३**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५२५/२०२३ भादवि ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १४/०७/२०२३ रोजी २३.०० वा ते दि १५/०७/२०२३ रोजी ०६.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०८/२०२३ रोजी १८.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सागर लक्ष्मण दिंडोरे,वय-१९ वर्षे,रा- ६०,विष्णु नगर मंजरेवाडी सोलापूर. |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरट |
| **गेला माल** | | १६,०००/- रू चे त्यात रोख रक्कम व काळसर रंगाचा विवो वाय ३५ कंपनीचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे घराचे मुख्य दरवाजचे दार अर्धवट उघडे ठेवून फिर्यादी हा रात्री झोपी गेला असता उशाजवळ ठेवलेला वरील वर्णनाचा व किंमतीचा मोबाईल व फिर्यादीचे वडिलांची अडकवलेल्या पॅन्टच्या मागील खिश्यातून एक हजार रूपये हे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेला आहे म्हणून.तपास- पोह/२७३/गायकवाड- ७६५०२७३२७३ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४३/२०२३ भादवि ३९२,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/०८/२०२३ रोजी १६.०० वा आर.टी.ओ ऑफिस चे गेट बाहेर आंबेडकर चौक सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०८/२०२३ रोजी २२.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | तुकाराम शिवाजी सलगर,वय-४१ वर्षे,रा- मु.पो.जामगाव ता.मोहोळ जि सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दोन अनोळखी इसम |
| **गेला माल** | | १२,००,०००/- रू चे एक टाटा कंपनीचा २५१८ टँकर निळा पिवळा रंगाचा. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ताब्यातील टँकर क्र एमएच १३ एएक्स ३४१५ हा घेवून फिर्यादीचा मावस भाऊ लक्ष्मण रामचंद्र डवले (ड्रायव्हर) व अभिमान बेलछत्रे (क्लिनर) असे दोघे नमुद टँकर चे पासिंग करणेकरीता आर.टी.ओ.ऑफिस विजापूर रोड सोलापूर येथे जावून सदर ठिकाणचे पासिंगचे काम संपवून गावाकडे येताना दोन अनोळखी इसम यांनी नमुद ठिकाणी फिर्यादीचे मावस भाऊ व क्लिनर यांना धक्काबुक्की करून फिर्यादीचे नमुद वर्णनाचा व किंमतीचा टँकर जबरदस्तीने चोरी करून घेवून गेले आहेत.म्हणून.तपास- पोसई गायकवाड- **९८३४४३१७५०** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०५/२०२३ भादवि २७९,३३७,३३८ सह मोवाका १८४/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०८/२०२३ रोजी १४.३० वा. जुना बोरामणी नाका सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०८/२०२३ रोजी २०.४३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुर्यकांत विजय फुलमाळी,वय-४७ वर्षे,रा-मुपो कुमठे फुलमाळी वस्ती कुमठे तांडा सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दिलीप भारत गोडसे,वय-३६ वर्षे,रा- मल्लेवाडी ता.मंगळवेढा जि.सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे वरील ठिकाणावरून पत्नीस हॉस्पीटल साठी मो.सायकल क्र एमएच १३ डी ए १९९७ या वरून जात असतान यातील आरोपी मजकूर यांने त्यांच्या ताब्यातील बल्कर ट्रक क्र एमएच १२ ओ जी २४०६ हा हायगयीने बेदकारपणे चालवून मागून फिर्यादी व तिची |

| | | |
|---|---|---|
| | | पत्नीस धडक देवून गंभीररित्या जखमी करून फिर्यादीचे मोटार सायकलचे नुकसान केले आहे. म्हणून.तपास- पोह/१२०३ जाधव- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५२५/२०२३ अन्न सु.व.मा.का क २६ (२)(i)२६(२)(ii)२६(२)(iv)]सहवाचन कलम २७ (३)(e)३०(२)(a) नियमन ३,१,७, शिक्षापात्र कलम ५९ सह वाचन नियमन २,३,४ सह भादवि १८८,२७२,२७३,३३८. प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि ०८/०८/२०२३ रोजी १२.१५ ते १३.३० वा चे दरम्यान मौलाली चौकातील मे.अज्जो पान शॉप व लष्कर बेडर पुल येथील मे.संग पान शॉप या टपरीत सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०८/०८/२०२३ रोजी १८.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | प्रज्ञा प्रमोद सुरेस,वय-३८ वर्षे,नेम- अन्न व औषध प्रशासन म.राज्य सोलापूर.जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अकबर मकबुल नाईकवाडी, २) राजू प्रतापसिंग बडुरवाले, रा- सोलापूर |
| **मिळाला माल** | | ६,२७०/- रूचे त्यात एकूण गोवा ,गुटखा,विमल पानमसाला,सुंगधीत तंबाखू, |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील नमुद आरेपीत मजकूर यांनी त्याच्या मालकीच्या व त्यांच्या ताब्यातील पान टपरीमधून प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता विक्री हेतू साठा करून मा.शासनाच्या वतीने मा.अन्न सुरक्षा आयुक्त अन्न व औषध प्रशासन मुंबई यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये अधिसूचना क्र असुमाअ/अधिसुचना/४९६/७ दि १८ जुलै २०२३ नुसार जारी केलेल्या प्रतिबंधीत गुटखा,मावा इत्यादी तत्सम अन्न पदार्थाचा विक्री बंदी आदेशाचे भंग केलेले आहे तसेच विक्री करण्याचे उद्देशाने साठा करून नमुद कलमाचा भंग केला आहे.व आदेशाची अवज्ञा केलेली असून शिक्षापात्र कलम ५९ नुसार शिक्षेस पात्र आहे.म्हणून.तपास- पोसई माळी- **८८८८८५२०९७** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४८८/२०२३ भादवि ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २९/०५/२०२३ रोजी १३.०० वा ते दि ०८/०८/२०२३ रोजी १५.१५ वा चे दरम्यान ४६/९/४ ए आयोध्या नगर प्रभाकर महाराज रोड बुधवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०९/०८/२०२३ रोजी ०१.४३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | विष्णुकांत नंदकिशोर राठी,वय-४६ वर्षे,रा- ४६/९/४ ए आयोध्या नगर प्रभाकर महाराज रोड बुधवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरट |
| **गेला माल** | | ८,२१,०००/- रू चे सोने चांदी व भारतीय चलनाचे नोटा. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे आई हया नवम्मी कार्यक्रमासाठी जाताना सोने घालून गेल्या होत्या व कार्यक्रमावरून आल्यानंतर सदरचे सोने नेहमीप्रमाणे कपाटातील लॉकर मध्ये काढून ठेवून कपाटाची चावी नेहमीप्रमाणे कपाटातच लटकून ठेवली होती, त्यानंतर दि ८/०८/२०२३ रोजी फिर्यादीचे आईस काही पैसे हवे होते त्याकरीता त्या कपाटात ठेवलेले पैसे घेण्याकरीता गेल्या असता त्यांना वरील ठिकाणी पैसे व सोने दिसून आले नाही त्यामुळे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या ताब्यातील वरील किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम ही फिर्यादीच्या संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास- सपोनि धायगुडे- **८८८८८०८९०८** |